सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले ▲ अंक : १७ ▲ शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर २०२५ ▲ पाने : ४ ▲ अमळनेर ▲ किंमत : १ रु. Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

१० ऑक्टोबर

- 'श्यामची आई' या चित्रपटाला राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाले.
- विद्याधर गोखले यांच्या 'सुवर्णतुला' नाटकाचा प्रीमियर झाला.
- आदर्श सेन आनंद भारताचे २९ वे सरन्यायाधीश बनले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**



## जळगावहून आता काही तासांत गाठा मुंबई, अहमदाबाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जळगाव विमानतळावरून 'उडान' योजनेंतर्गत गोवा, पुणे, हैदराबादसाठी विमानसेवा सुरू करण्यात आलेली आहे. त्यानंतर आता जळगावहून मुंबई, अहमदाबाद येथे अवघ्या काही तासांत प्रवाशांना पोहोचता येणार आहे. जळगाव विमानतळावरून 'अलायन्स एअर कंपनी'कडून सध्या आठवडाभरातून चार दिवस सुरू असलेली जळगाव–मुंबई विमानसेवा २६ ऑक्टोबरपासून दररोज उपलब्ध होणार आहे. याबरोबरच दोन महिन्यांपासून बंद असलेली अहमदाबाद सेवाही पुन्हा सुरू होणार आहे. ही सेवा ऑगस्टपासून बंद होती. आता दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ही सेवा पुन्हा सुरू करण्यात येत असून, मंगळवार, गुरुवार, शुक्रवार आणि रविवार अशा आठवड्यातील चार दिवस ही सेवा उपलब्ध होणार आहे. दिवाळी सणापूर्वी विमानसेवा सुरू होणार असल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# पांझरा नदीपात्राचे वाळूमाफियाच सम्राट...!

## मग यंत्रणा त्यांची कोण? उपस्थित होतोय प्रश्न



वाळूचा अवैध साठा.



पालिकेचे कर्मचारी साफ करताहेत रस्त्यावर पडलेली वाळू.

**ग्लोबल महातेज अमळनेर**

अमळनेर : तालुक्यातील मूडी–मांडळ शिवारातील पांझरा नदीच्या पात्रातून पुन्हा अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. काही दिवसांपूर्वी तलाठी व वाळू माफियांच्या संघर्षानंतर हा उपसा तात्पुरता थांबविण्यात आला होता. मात्र, वाळुने भरलेले डंपर पुन्हा बिनधास्त सुरू झाल्याचे दिसून येत आहे. यावर महसूल विभागाने अंकुश लावावा, अशी मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

या अवैध वाहतुक करणाऱ्या डंपरमुळे रस्त्यांवर वाळू सांडत आहे. वाहनचालकांना वाहन चालविणे कठीण झाले आहे. किरकोळ अपघातही होत असल्याचे निदर्शनास येत आहे. महसूल विभागाने याकडे दूर्लक्ष केल्याचे दिसत आहे. वाळू माफियांना कोणाचे अभय आहे का? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

पांझरा नदीकाठावरील उपशावर महसूल विभाग आणि पोलिसांनी अद्याप कारवाई का केली नाही? मागील हल्ल्याच्या घटनेनंतरही वाळू उपसा पुन्हा सुरू कसा झाला? परवाना नसताना हे डंपर शहरात खुलेआम कसे फिरत आहेत? वाळू उपसामुळे नदीपात्राची रचना बिघडत असून पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच शासनाचे महसूलही बुडत आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी तात्काळ लक्ष घालून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.



## खाणपट्टा मंजूर नसतानाही तालुक्यात मुरुम उत्खनन जोरात !

## नोटांच्या वासाने यंत्रणा मात्र कोमात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यातील हेडावे–सारबेटे शिवारात मोठ्या प्रमाणात अवैध मुरुम उत्खनन सुरु आहे. हजारो ब्रास मुरुमची सर्रासपणे वाहतूक सुरू आहे. तालुक्यात कोठेही खाणपट्टा मंजूर नसतानाही उत्खनन आणि वाहतूक सूरू आहे. महसूल विभागाने याबाबत लक्ष देऊन कारवाई, करावी अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

तत्पूर्वी गलवाडे रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात मुरूम उत्खनन झाले होते. मात्र, प्रसिद्धी माध्यमांनी बातमी प्रकाशित झाल्यानंतर तेथे मुरुम उत्खनन बंद झाले आहे. हेडावे–सारबेटे शिवारात जेसीबीच्या साह्याने हजारो ब्रास उत्खनन सुरू आहे. दररोज २० ते २५ डंपरने अवैध मुरुम वाहतूक सुरू आहे. खाणपट्टा मंजूर नसतानाही मुरुम उत्खनन कसे केले जाते? हा प्रश्न ग्रामस्थ व पर्यावरणप्रेमी उपस्थित करीत आहेत. यंत्रणा व मुरूम माफिया यांच्यात आर्थिक साटे–लोटे आहेत.

नोटांच्या बंडलांच्या वासाने यंत्रणा जणू कोमात गेली आहे. त्यांना काहीही दिसेनासे झाले आहे, असा सर्रास आरोप होतो आहे. अमळनेरात अवैध प्रकारांचे पार धिंडवडे निघाले आहेत. मात्र, यंत्रणा व लोकप्रतिनिधी तेरी भी चूप और मेरी भी चूप या नायाने वागत असल्याचाही आरोप आहे. या पार्श्वभूमीवर यंत्रणेने थोडेफार तरी स्वतःचे अस्तित्व दाखवावे. येथे जंगलराज नसून कायद्याचेही थोडेफार राज्य आहे, हे सिद्ध करावे, अशी मागणी होत आहे.

तालुक्यात अनेक ठिकाणच्या टेकड्या मुरुम व डबर भुईसपाट झाल्या आहेत. पर्यावरणाची मोठी हानी झाली आहे. काही गावांमध्ये २० ते २५ ग्रामस्थांच्या सह्या घेऊन ग्रामपंचायतीचा ठराव करून गावशिवारात रस्त्यांसाठी मुरुम काढण्याची परवानगी घेतली जाते. मात्र, हा मुरुम इतरत्र वापरला जातो अशी चर्चा आहे.

# अमळनेरमध्ये प्रेमीयुगुलांचे 'कॉफी कनेक्शन'

## कॅफेमधील चौकटी कप्प्यांमुळे होते गुप्त भेटीची सोय!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

अमळनेर : शहरात अलीकडच्या काळात विविध कॉफी शॉप्स, ज्यूस सेंटर आणि मिनी रेस्टॉरंट्सची संख्या झपाट्याने वाढली आहे. महाविद्यालयातील तरुणाईचा वावर या ठिकाणी नेहमीच असतो. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून प्रेमीयुगुलांचा वाढता ओघ आता चर्चेचा विषय ठला आहे. अनेक कॉफी शॉपमध्ये ग्राहकांसाठी वेगवेगळ्या चौकटीतील 'कप्पे' तयार करण्यात आले आहेत.



हे अर्धविलग आणि बंदिस्त कप्पे 'एकांताची' सोय देत असल्याने काही प्रेमीयुगुल त्याचा मनसोक्त फायदा घेताना दिसतात. अनेक तरुणी चेहऱ्याला स्कार्फ बांधून कॉफी शॉपमध्ये प्रवेश करत असल्याचेही नागरिकांचे निरीक्षण आहे.

काही ठिकाणी या बंदिस्त कप्प्यांमुळे आत काय सुरू आहे हे बाहेरून लक्षातही येत नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे शहरातील पालकवर्ग आणि सामाजिक संघटना यांच्यात चिंता व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांमध्येही अशा ठिकाणांवर जाण्याची प्रवृत्ती वाढल्याने शिस्तभंगाचे प्रकार घडण्याचीभीतीवर्तवलीजातआहे.

शहरातील जबाबदार नागरिक आणि संघटांनी व पोलिसांनी या ठिकाणांवर अधूनमधून गस्त वाढवावी. तसेच व्यवसायिकांनीही सार्वजनिक शिस्तीचे पालन करावे, अशी नागरिकांमधून मागणी होत आहे. कॉफी शॉप हे संवाद आणि मैत्रीचे ठिकाण असावे. अनुचित वर्तन रोखण्यासाठी प्रशासनाने ठोस नियमावली तयार करावी, अशीही अपेक्षा सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# अमळनेर तालुक्यात भेसळयुक्त दुधाचा धंदा तेजीत !

## दूध, खवा घेताना सावधानता बाळण्याचा तज्ज्ञांचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सणासुदीच्या काळात दूध, खवा आणि दुग्धजन्य पदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. या पार्श्वभूमीवर अमळनेर तालुक्यात बनावट दूध व खवा विक्रीचा धंदा पुन्हा जोर धरत आहे. ग्राहकांनी दूध किंवा खवा घेताना विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे.

शहरातील काही मिठाई विक्रेत्यांकडील खव्याबाबत अनेकांच्या गंभीर तक्रारी आहेत. अनेकांनी प्रशासनाकडे त्यांच्याबाबत तक्रारीही केल्या आहेत. मात्र, चिरीमिरी देऊन ही मंडळी कोणतीही कारवाई होऊ देत नाहीत. त्यांच्याकडील दुग्धजन्य पदार्थांना एक प्रकारचा उग्र वास असतो. अनेकदा हा वास येऊ नये म्हणून त्यात अनैसर्गिक (सिंथेटिक तथा केमिकल) सेंटचा वापर करून तिला सुगंधी केले जाते. ही मिठाई खाल्ल्यानंतर पोटासह संपूर्ण शरीरावर दुष्परिणाम करणारे आजार होतात. त्यामुळे नागरिकांनी दर्जेदार ठिकाणाहुनच महाग असलेली का असेना मात्र चांगल्या प्रतीचीच मिठाई घ्यावी, अन्यथा शेजारपाजाऱ्यांना सोबत घेऊन एखादा हलवाई किंवा कारागीर बोलावून त्याला मटेरियल देऊन मजुरीने मिठाई व फराळाचे पदार्थ करून घ्यावेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने हा सर्वात उत्तम पर्याय आहे.

शहरात उत्तम दर्जाचे दूध देणाऱ्या काही डेअरी आहेत हेही तितकेच खरे आहे. ८ ते ९ डेअऱ्यांमध्ये ग्राहकांसमोर दूध काढून देण्यात येते. पैलाड परिसरात ३, बहादरपूर नाका येथे २, तर सुभाष चौक परिसरात १ अशा चांगल्या डेअरी ग्राहकांचा विश्वास जिंकत आहेत. मात्र, काही ठिकाणी शंभर ते दीडशे

..पान ३ वर

## रिफाईंड ऑईल, शॅम्पूची मोठ्या प्रमाणात विक्री का होते ?

दै. ग्लोबज महातेजने नकली दुधाचे एकूणच तंत्र, मंत्र व यंत्र याचा सखोल तपास केला असता एक धक्कादायक बाब समोर आली आहे. नकली दुधाचे निर्माते नियमितपणे काही दुकानांतून खूप मोठ्या प्रमाणावर रिफाईंड ऑईल व शॅम्पू घेऊन जातात. ही बाब सदर किराणा दुकानदारांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितली आहे. नकली दुधाला जाड साय यावी, यासाठी रिफाईंड ऑईलचा वापर केला जातो. तर दुध निर्मितीत काही केमिकल अनैसर्गिक दुधाच्या वासाची सुगंधी द्रव्य व प्रसंगी युरियादेखील वापरला जातो. एका लिटर दुधापासून साधारणतः दहा लिटर दूध तयार करण्याची किमया भेसळखोरांना अवगत आहे. विशेष म्हजणे याच दुधापासून बनविलेले



पनीराची स्वस्त दरात मोठ्या प्रमाणावर सर्रास विक्री होते. खऱ्याखुऱ्या दुधापासून बनविलेल्या पनिराच्या उत्पादनाची किंमत व या नकली दुधापासून बनविलेल्या पनिराची किंमत यात खूप मोठा फरक असतो, हे विशेष! त्यामुळे नागरिकांनी पनीर घेतानाही योग्य ती खबरदारी घ्यावी किंवा चांगल्या दुधापासून घरीच पनीर बनविणे केव्हाही उत्तम.

# अमळनेर बाजार समितीत मक्याच्या दराचा झाला आपटबार

## दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या खिशात फुटला सुतळी बॉम्ब

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सर्व प्रकारच्या आसमानी संकटांना तोंड देत शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला मका दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या आशेने येथील बाजार समितीत विक्रीसाठी आणला. मात्र, शेतकऱ्यांच्या अपेक्षित भावापेक्षा मक्याच्या दराचा आपटबार झाला आहे. आपण खिसा भरून पैसे घेऊन जाऊ या विचाराने आलेल्या शेतकऱ्यांच्या खिशातच जणू सुतळी बॉम्ब फुटला आहे.

कपाशीला भाव मिळत नाही शिवाय बियाणे, फवारे, मजुरी यांचे दर परवडत नाही. पावसाचा लहरीपणाही मोठा फटका देऊन जातो, म्हणून कापसाचा पट्टा या नावाने ओळखला जाणारा अमळनेर व पंचक्रोशीतील गावांनी पर्याय म्हणून खूप मोठ्या प्रमाणावर मका पेरला होता. हा मका येथील बाजार समितीत विक्रीसाठी आणला असता त्यास केवळ ११०० ते १५०० रुपये क्विंटलचा भाव मिळाला. सरासरी हा दर १३०० रुपये प्रतिक्विंटल ठरला आहे. शेतकऱ्यांना असे वाटले, की शासकीय हमीभावानुसार २४०० रुपये प्रतिक्विंटल मका खरेदी होईल. मात्र, अपेक्षित दरापेक्षा निम्मे दरात शेतकऱ्यांना मका विकावा लागला. त्यामुळे शेतकरी वर्ग प्रचंड निराश झाला






आहे. सण साजरे करणे तर दूर पण व्याजाने घेतलेली उसनवारी, गोल्ड लोन हेही फेडले जाईल की नाही? याचीही खात्री नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. दरम्यान, या कमी दराबाबत गावरान जागल्या सेना संघटनेचे अध्यक्ष विश्वास पाटील व युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आवाज उठविला आहे. त्यांनी बाजार समितीचे सभापती, सचिव व संचालक मंडळाला निवेदन देऊन शेतकऱ्याला न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे, की शेतकऱ्यांच्या शेतमालातील आर्द्रतेची अचूक मोजणी करावी. मालाच्या प्रतीनुसार याचा तुलनात्मक दर निश्चित करावा. त्यानुसार योग्य भाव देण्यात यावा. शेतकऱ्यांची लूट थांबविण्यात यावी. दरम्यान, याबाबत बाजार समितीने पुढाकार घेऊन मार्ग काढण्याची मागणी होत आहे.

> अमळनेर बाजार समितीत सध्या मका ओल्या स्वरूपात येत आहे. त्याला वाळविल्यानंतर त्यात घट होते. त्यामुळे आर्द्रता तपासूनच भाव दिला जात आहे. शिवाय शासकीय हमीभाव केंद्र सुरू न झाल्याने मालाचा दर्जा पाहून भाव दिला जात आहे.
>
> **– उन्मेष राठोड, सचिव, बाजार समिती, अमळनेर.**



# पती-पत्नीच्या संयुक्त मालमत्तेवर दिल्ली उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिल्ली उच्च न्यायालयाने पती-पत्नीच्या संयुक्त नोंदणीकृत मालमत्तेसंदर्भात एक ऐतिहासिक निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती अनिल क्षेत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने २२ सप्टेंबर २०२५ रोजी हे स्पष्ट केले आहे. केवळ बँकेचे ईएमआय भरल्याच्या आधारावर पतीला संयुक्त मालमत्तेवर एकट्याने मालकी हक्क सांगता येणार नाही. हा निर्णय भारतातील महिलांच्या मालमत्ता हक्कांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

**न्यायालयाचे महत्त्वाचे निरीक्षण**

न्यायालयाने कायदेशीर आणि सामाजिक दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. संयुक्त मालकी : मालमत्ता पती-पत्नी दोघांच्या नावावर नोंदणीकृत असल्यास ती संयुक्त मालकीची ठरते. विवाहकाळात खरेदी केलेल्या मालमत्तेत दोघांचाही समान वाटा असतो. एकाने जरी ईएमआय किंवा खरेदी खर्च भरला असला तरी. बेनामी कायद्याचे उल्लंघन : पतीचा एकतर्फी दावा बेनामी मालमत्ता व्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ चे उल्लंघन ठरतो. मालमत्ता संयुक्त नावावर नोंदविली असल्यास खरी खरेदी करणारा व्यक्ती एकटा हक्क सांगू शकत नाही.



फक्त ईएमआय भरल्याने एकट्याचा मालकी हक्क सांगता येणार नसल्याचे केले स्पष्ट

**स्त्रीधनाचा मुद्दा आणि कायदेशीर पार्श्वभूमी**

या खटल्यात पत्नीने दावा केला, की मालमत्ता विक्रीतून मिळालेल्या अतिरिक्त रकमेपैकी (सुरप्लस १.०९ कोटी रुपये) ५० टक्के तिच्या स्त्रीधनातून आली आहे. स्त्रीधनाचे स्वरूप : हिंदू कायद्यानुसार स्त्रीधन हे महिलेचे स्वतंत्र आणि वैयक्तिक मालमत्तेचे स्वरूप आहे. जे लग्नपूर्व किंवा लग्नानंतर पालक, नातेवाईक, पती किंवा स्वतःच्या कमाईतून मिळते. मात्र न्यायालयाने स्पष्ट केले, की विवाहकाळात संयुक्तरित्या खरेदी केलेली मालमत्ता स्त्रीधनाचा भाग होऊ शकत नाही. ती दोघांच्या योगदानाने मिळविलेली संयुक्त संपत्ती आहे. मालकी हक्क : नोंदणीवेळी दोघांची नावे असल्यास पैशाचा स्रोत पतीकडून असला, तरी पत्नीचा हक्क नाकारता येत नाही. या प्रकरणात जोडपे १९९९ मध्ये विवाहबद्ध झाले आणि २००५ मध्ये मुंबईत फ्लॅट संयुक्तरित्या खरेदी केला. २००६ पासून ते वेगळे राहतात. पतीने घटस्फोटासाठी दावा दाखल केला आहे.

**महिलांसाठी महत्त्व आणि दूरगामी परिणाम**

हा निर्णय महिलांच्या मालमत्ता हक्कांसाठी मोठा विजय आहे. **समान वाटा :** विवाहकाळात संयुक्त मालमत्तेत पत्नीचा समान हक्क असतो. पतीने जरी ईएमआय भरलेला असला तरी. **हक्क मजबूत :** यामुळे भविष्यातील कौटुंबिक आणि मालमत्ता वादांमध्ये महिलांचा हक्क अधिक सुरक्षित होईल. न्यायालयाने संयुक्त मालमत्ता म्हणजे दोघांचाही हक्क, हा मूलभूत

## अभिषेक शर्मा की बहन कोमल बनीं लुधियाना की बहू, चूड़ा और मेहंदी में सूट में छाईं



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

क्रिकेटर अभिषेक शर्मा की बहन कोमल शर्मा ३ अक्टूबर २०२५ को शादी के बंधन में बंध गईं। उनकी प्री-वेडिंग रस्मों की तस्वीरें सोशल मीडिया पर छाई हुई हैं। हल्दी, मेहंदी और चूड़ा सेरेमनी में कोमल के स्टाइलिश लुक्स ने सबका दिल जीत लिया।

**शादी की रस्में और कोमल का अंदाज**

कोमल की शादी लुधियाना के लविश ओबेरॉय के साथ हुई। एशिया कप २०१५ के बाद शादी की रस्में शुरू हुईं, जिनमें अभिषेक ने भाई का फर्ज निभाते हुए स्टाइल और डांस से रंग जमाया। कोमल ने हर रस्म में अपने लुक्स को खास बनाया। हल्दी में साड़ी, मेहंदी में कुर्ता और चूड़ा सेरेमनी में सूट में उनकी सादगी और सुंदरता ने सबको प्रभावित किया।

**हल्दी का लुक**

कोमल ने हल्दी के लिए गुलाबी फ्लोरल साड़ी चुनी, जिसे उन्होंने सादी गुलाबी ब्लाउज के साथ पहना। फूलों का गजरा और गेंदे के फूलों से सजा दुपट्टा उनके लुक को और खास बना रहा। यह स्टाइल राधिका मर्चेंट के हल्दी लुक से प्रेरित था। लविश ने सफेद कुर्ता-पायजामा और पीली हाफ जैकेट में कूल अंदाज दिखाया।

**मेहंदी का लुक**

मेहंदी के लिए कोमल ने हरे रंग का स्लीवलेस कुर्ता चुना, जिसमें सिक्विन वर्क चमक बिखेर रहा था। इसके साथ सादी पैंट और दुपट्टा पहनकर उन्होंने कंफर्ट और स्टाइल का शानदार मेल दिखाया। बिना जूलरी के भी उनका लुक मेहंदी के लिए परफेक्ट था।

**चूड़ा सेरेमनी**

कोमल ने चूड़ा सेरेमनी के लिए लाल रंग का लॉन्ग ए-लाइन सूट चुना। इसकी गोल नेकलाइन और बॉर्डर पर गोल्डन सिक्विन वर्क के साथ बेल पैटर्न ने सूट को भारी और खूबसूरत लुक दिया। ३/४ स्लीव्स और मैचिंग दुपट्टे के साथ झुमके, चूड़ा और कलीरे में कोमल बेहद सुंदर लगीं।

**अभिषेक का स्टाइल**

अभिषेक ने हल्दी में हल्के हरे रंग का कुर्ता पहना, जिसमें सिक्विन और एम्ब्रॉयडरी वर्क था। सफेद पायजामा और स्टॉल के साथ चश्मे में उनका स्टाइलिश अंदाज छा गया।

**शादी की तैयारियां**

शादी की रस्में इस साल माता के जागरण के बाद शुरू हुईं। एशिया कप के कारण बीच में रस्मों में रुकावट आई, लेकिन हल्दी और मेहंदी के बाद कोमल ने शादी से पहले गुरुद्वारे में आशीर्वाद लिया। मेहंदी लगे हाथों में उनकी खुशी साफ झलक रही थी। लविश घोड़ी चढ़कर बारात लेकर अपनी दुल्हन को लेने पहुंचे।

**सोशल मीडिया पर धूम**

कोमल की प्री-वेडिंग तस्वीरें सोशल मीडिया पर वायरल हैं। चाहे हल्दी की साड़ी हो, मेहंदी का कुर्ता या चूड़ा सेरेमनी का सूट, उनके हर लुक को फैंस ने खूब पसंद किया। लविश के साथ उनकी जोड़ी और अभिषेक के स्टाइलिश अंदाज ने भी सबका ध्यान खींचा। कोमल शर्मा की शादी ने लुधियाना में नई बहू का स्वागत किया। उनके प्री-वेडिंग लुक्स और रस्मों की तस्वीरें फैंस के लिए यादगार बन गईं। अभिषेक ने भाई के रूप में अपनी जिम्मेदारी और स्टाइल से समां बांध दिया। यह शादी न सिर्फ प्यार की, बल्कि स्टाइल और परंपराओं का भी शानदार मेल थी।



## ५० सेकंदांच्या रोलसाठी ५ कोटी

## सौंदर्य अन् मानधनात दीपिका, ऐश्वर्यालाही टक्कर देणारी अभिनेत्री कोण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत काही अभिनेत्री त्यांच्या सौंदर्य आणि अभिनयासाठी नेहमीच चर्चेत असतात. दीपिका पदुकोण आणि ऐश्वर्या राय यांसारख्या अभिनेत्रींची नावे यात आघाडीवर असतात. एक अभिनेत्री अशी आहे, की जी सौंदर्य आणि मानधनाबाबत या दोघींनाही टक्कर देते. ही अभिनेत्री आहे नयनतारा. जिने अवघ्या ५० सेकंदांच्या जाहिरातीसाठी तब्बल ५ कोटी रुपये घेतले होते.

**८० चित्रपट आणि सर्वाधिक मानधनाची अभिनेत्री**

नयनताराने २० वर्षांच्या कारकीर्दीत ८० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. रजनीकांत, शाहरुख खान, जयराम, नागार्जुन अक्किनेनी यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत तिने स्क्रीन शेअर केली आहे. २०१८ मध्ये फोर्ब्स इंडियाच्या ' सेलिब्रिटी १०० ' यादीत समाविष्ट होणारी ती एकमेव आघाडीची दाक्षिणात्य अभिनेत्री ठरली. तिने अनेक पुरस्कार जिंकले असून, करिअरमध्ये तिने अनेकदा जोरदार पुनरागमन केले आहे.

**प्रत्येक चित्रपटासाठी दहा कोटी रुपये**

रिपोर्टसनुसार नयनतारा प्रत्येक चित्रपटासाठी सुमारे १० कोटी रुपये मानधन घेते. त्यामुळे ती भारतातील सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री ठरली आहे. तिचा अलीकडचा चित्रपट ' टेस्ट ' प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. याशिवाय नेटफ्लिक्सने तिच्या आणि दिग्दर्शक विघ्नेश शिवन यांच्या लग्नावर आधारित 'नयनतारा : बियॉन्ड द फेयरीटेल ' ही डॉक्युमेंट्री प्रदर्शित केली आहे.

**शाहरुख खानसोबत बॉलिवूडमध्ये पदार्पण**

२०२३ मध्ये नयनताराने शाहरुख खानसोबत ' जवान ' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. २०१५ मध्ये ' नानुम राउडी थान ' चित्रपटाच्या सेटवर तिची ओळख दिग्दर्शक विघ्नेश शिवन यांच्याशी झाली. दोघे प्रेमात पडले आणि नंतर त्यांनी लग्न केले. सरोगेट प्रक्रियेद्वारे त्यांना जुळी मुलेही झाली.



**५० सेकंदांसाठी ५ कोटी**

एका कंपनीच्या जाहिरातीत काम करण्यासाठी नयनताराला करारबद्ध करण्यात आले होते. या जाहिरातीसाठी अवघ्या ५० सेकंदांच्या भूमिकेसाठी तिला ५ कोटी रुपये मिळाले. तिचे सौंदर्य, अभिनय आणि व्यावसायिक यश यामुळे ती आज चित्रपटसृष्टीत वर्चस्व गाजवत आहे.

# तीन मुलीच? म्हणणाऱ्यांना वडिलांचे सणसणीत उत्तर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

समाजात आजही काही लोक मुलींच्या जन्मानंतर नाक मुरडतात. मुलींच्या पालकांकडे तुच्छ नजरेने पाहतात. अशा मानसिकतेला छेद देणारे एका वडिलांचे अनोखे उत्तर सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यांनी आपल्या कारच्या मागे लिहिलेला एक खास मेसेज सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

**कारवरील मेसेजने जिंकली मने**

भारतात ट्रक आणि गाड्यांवरील मजेदार स्लोगन्स नेहमीच चर्चेत असतात. ' मेरा भारत महान ' किंवा ' हॉर्न ओके ' यांसारखे वाक्य प्रत्येक ट्रकवर दिसतात. काही गाड्यांवर शायरी, म्हणी किंवा टोमणे लिहिलेले असतात. जे रस्त्यावर सर्वांचे लक्ष वेधतात. पण सध्या एका कारच्या मागे लिहिलेला मेसेज सोशल मीडियावर भावूक करणारा ठरला आहे.

**या कारवर लिहिले आहे–** ' तुम्ही मला अजिबात घाबरवू शकत नाही, कारण मला तीन मुली आहेत '. हा मेसेज मुलींना कमी लेखणाऱ्यांना आणि त्यांना ओझे समजणाऱ्यांना सणसणीत उत्तर आहे.

**मुली आणि वडिलांचे अतूट नाते**

मुलगी आणि वडिलांचे नाते हे नेहमीच खास असते. मुलगी आपल्या वडिलांना सुपरहिरो मानते, तर वडिलांसाठी ती राजकन्येपेक्षा कमी नसते. जन्मापासून ती मोठी होईपर्यंत वडील तिची प्रत्येक गोष्ट आपुलकीने जपतात. मुलगी एक दिवस सासरी जाणार, हे माहीत असूनही वडील तिच्यावर जीवापाड प्रेम करतात.

**व्हायरल व्हिडिओमुळे सगळे भावूक**

या कारच्या मागील मेसेजचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर सर्वांचे मन जिंकत आहे. मुलींना कमी समजणाऱ्या समाजाला हा मेसेज एक सकारात्मक संदेश देतो. मुलीही माहेरचे सोने, सौख्याचे औक्षण आणि अंगणी पैंजण आहेत. ती कधीच परके धन नसते, तर आई-वडिलांच्या हृदयातील अमूल्य ठेवा असते. या वडिलांनी आपल्या तीन मुलींवरील प्रेम, अभिमान याचे उदाहरण सगळ्यांसमोर ठेवले आहे.



## १६ वर्षांच्या मुलीला न चुकता सांगा या ६ गोष्टी...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या वेगवान आणि आव्हानात्मक जगात १६ वर्षांच्या मुलींना सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि सुरक्षित बनवणे ही प्रत्येक पालकाची जबाबदारी आहे. विशेषतः पुरुष पालकांनी आपल्या मुलींना काही महत्त्वाच्या गोष्टी शिकविणे गरजेचे आहे. ज्यामुळे त्या आयुष्यात कोणाचाही गैरफायदा घेऊ शकणार नाहीत. तज्ज्ञ आणि समुपदेशकांनी सुचविलेल्या सहा महत्त्वाच्या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत. ज्या प्रत्येक वडिलांनी आपल्या १६ वर्षांच्या मुलीला आवर्जून सांगाव्यात.

### १) स्वतःच्या मर्यादांचे महत्त्व समजा

मुलींना सर्वप्रथम स्वतःच्या वैयक्तिक मर्यादा समजावून सांगणे गरजेचे आहे. याचा अर्थ तुम्हाला कोणत्या गोष्टी स्वीकारार्ह आहेत आणि कोणत्या नाहीत, हे ठरविणे. उदा.- कोणाशी बोलताना, मैत्री करताना किंवा सोशल मीडियावर संवाद साधताना स्वतःच्या कम्फर्ट झोनची जाणीव ठेवा. ' तुला कधी अस्वस्थ वाटले, तर ' नाही ' म्हणायला शिक ', असे वडिलांनी सांगावे. यामुळे त्या परिस्थितीला स्पष्टपणे सामोरे जाऊ शकतात आणि अनुचित वर्तनाला थांबवू शकतात.

### २) आत्मविश्वासाने बोलणे आणि व्यक्त होणे

आत्मविश्वास हे मुलींचे सर्वांत मोठे शस्त्र आहे. वडिलांनी मुलींना त्यांचे विचार, भावना आणि मते स्पष्टपणे मांडायला शिकवावे. ' तुझे मत महत्त्वाचे आहे. तुला ते ठामपणे मांडण्याचा हक्क आहे', असे सांगणे तिच्या व्यक्तिमत्त्वाला बळकटी देते. यामुळे ती चुकीच्या प्रभावाखाली येण्यापासून किंवा दबावाखाली चुकीच्या गोष्टी स्वीकारण्यापासून वाचते. संवाद कौशल्य तिला आयुष्यभर साथ देते.

### ३) स्वसंरक्षणाची कला शिकवा

आजच्या काळात स्वसंरक्षण ही प्रत्येक मुलीची गरज आहे. वडिलांनी मुलींना मार्शल आर्टस्, कराटे किंवा मूलभूत स्वसंरक्षण तंत्र शिकण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यामुळे ती शारीरिकदृष्ट्या सक्षम होतेच. मात्र तिच्या मनातही आत्मविश्वास निर्माण होतो. ' तुझी सुरक्षा तुझ्या हातात आहे ', असे सांगताना तिला धोक्याच्या परिस्थितीत शांत राहून निर्णय घेण्याचे प्रशिक्षण द्यावे.

### ४) डिजिटल सावधानता शिकवा

सोशल मीडियाच्या युगात मुलींना ऑनलाईन सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. अनोळखी व्यक्तींशी बोलणे, वैयक्तिक माहिती शेअर करणे किंवा संशयास्पद लिंक्सवर क्लिक करणे टाळण्याचा सल्ला द्यावा. 'ऑनलाईन जगात सगळे खरे नसते ', असे सांगून तिला सायबर धोक्यांपासून सावध करावे. पासवर्डस् सुरक्षित ठेवणे आणि सोशल मीडियावर मर्यादित माहिती शेअर करणे यासारख्या सवयी तिला सुरक्षित ठेवतात.

### ५) स्वतःच्या मूल्याची जाणीव करून द्या

प्रत्येक मुलीला तिच्या स्वतःच्या किमतीची आणि आत्मसन्मानाची जाणीव असणे गरजेचे आहे. वडिलांनी तिला सांगावे, की तू जशी आहेस तशीच परिपूर्ण आहेस. कोणाच्याही मान्यतेसाठी तुला स्वतःला बदलण्याची गरज नाही. तिच्या स्वप्नांना, महत्त्वाकांक्षांना आणि व्यक्तिमत्त्वाला प्रोत्साहन द्या. यामुळे ती चुकीच्या नातेसंबंधांपासून किंवा दबावापासून स्वतःला वाचवू शकेल.

### ६) आर्थिक स्वातंत्र्याचे महत्त्व

१६ वर्षे हे वय असे आहे, की जिथे मुलींना आर्थिक जबाबदारी आणि स्वातंत्र्याची ओळख व्हायला लागते. वडिलांनी तिला बजेट बनविणे, बचत करणे आणि पैशाचे व्यवस्थापन शिकवावे. ' तुझ्या मेहनतीवर अवलंबून राहायला शिक ', असा सल्ला तिला भविष्यात स्वतंत्र बनवेल. यामुळे ती कोणावरही आर्थिकदृष्ट्या अवलंबून राहणार नाही. स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकेल.

**प्रेरणादायी संदेश**

या सहा गोष्टी मुलींना सशक्त, सुरक्षित आणि आत्मविश्वासपूर्ण बनवितात. वडिलांनी आपल्या मुलींशी मोकळेपणाने बोलणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलीच्या मनात हा विश्वास निर्माण करा, की ती स्वतःच्या आयुष्याची नायिका आहे. या गोष्टी शिकवून तुम्ही तिला अशा जगात तयार कराल, जेथे कोणीही तिचा गैरफायदा घेऊ शकणार नाही.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या 'नंदन डेअरी'च्या ग्राहकांमध्ये आनंदी आनंद!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

व्यवसायात बेईमानी करूनच पैसा कमावता येतो, या माणुसकीहीन प्रवृत्तीचे व असुरी महत्त्वाकांक्षेचे अनेकजण आहेत. मात्र कलियुगातही सच्चाई, नीतिमत्ता, सिद्धांत, प्रामाणिकपणा व लोकहिताची जाणीव ठेवूनही दोन पैसे कमावता येतात, हे ' नंदन डेअरी 'चे मालक तथा ज्येष्ठ समाजसेवक आप्पासाहेब श्री. भटा साहेबराव पाटील व त्यांच्या परिवाराने सिद्ध केले आहे.

'नंदन' हा शब्द संस्कृतातून मराठीत आला आहे. या शब्दाला अनेक अर्थ आहेत. ' नंदन 'चा मुख्य अर्थ आनंद किवा सुख देणारा आहे. असाच काहीसा आनंद अर्थात सुख नंदगाव (ता. अमळनेर) येथील आप्पासो. श्री. भटा साहेबराव पाटील यांनी आपल्या सुभाष चौकातील ' नंदन ' डेअरीच्या माध्यमातून सिद्ध केले आहे. श्री. भटा पाटील अतिशय गरीब कुटुंबात जन्मले. त्यांचे वडील श्री. साहेबराव शेनपडू पाटील यांच्याकडे केवळ दोन एकर शेती होती. ती कोरडवाहू असल्याने संपूर्णपणे निसर्गावर अवलंबून असे. त्यामुळे श्री. साहेबराव पाटील हे मोलमजुरी करून कुटुंबाची उपजीविका भागवायचे. अशा परिस्थितीतही मुलगा श्री. भटा पाटील यांना त्यांनी अकरावीपर्यंत अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयात शिक्षणासाठी पाठविले. श्री. भटा पाटील यांनी अकरावी उत्तीर्ण झाल्यानंतर अमळनेरमधील तांबेपुरा परिसरात असलेल्या विप्रो कंपनीत रोजंदारीवर काम करणे सुरू केले. मात्र, तेथील काम अनियमित होते. त्यामुळे ते शिवणकाम शिकले. सुभाष चौक परिसरातील बाजारपेठेत श्री. भटा पाटील यांनी श्री. जैन नामक व्यक्तींशी संवाद साधला. त्यानंतर श्री. जैन यांच्या दुकानाबाहेरील ओट्यावर शिवणकामाचे दुकान थाटले. याचवेळी श्री. जैन यांनी


श्री. भटा साहेबराव पाटील


योगेश भटा पाटील

श्री. भटा पाटील यांना ढेपचा (पेंड) व्यवसाय करण्यासाठीही प्रवृत्त केले. त्यातही त्यांनी काहीसा जम बसविण्याचा प्रयत्न या व्यवसायाद्वारे केला.

श्री. भटा पाटील यांनी शिवणकाम व ढेपचा व्यवसाय करतानाच नंदगावमधील समाजकार्यात सहभाग घेणे सुरू केले. हा सहभाग घेताना त्यांनी भाऊबंदकीसह गावकऱ्यांमध्ये सहकार्याची भावना जोपासणे सुरू केले. मनमिळावू स्वभाव, कोणाच्याही मदतीला तत्परतेने धावून जाणे या सेवाभावाची पावती श्री. भटा पाटील यांना गावकऱ्यांकडून मिळाली. गावकऱ्यांनी एकमताने निर्णय घेऊन १९९८ मध्ये श्री. भटा पाटील यांना बिनविरोध निवडीद्वारे सरपंच बनविले. त्यावेळी नंदगावमध्ये सहकार तत्त्वावर दूध डेअरी सुरू होती. त्यामुळे या डेअरीच्या माध्यमातून अमळनेरला दूध वाटपाचे काम हाती घेतले. या कार्यातील अनुभवांतून श्री. भटा पाटील यांनी अमळनेरमध्ये स्वतःचा दूध व्यवसाय सुरू केला. याचवेळी अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत ते संचालकपदी निवडून आले. त्यानंतरही त्यांना पुन्हा पाच वर्षांसाठी स्वीकृत संचालक म्हणून संधी मिळाली.

श्री. भटा पाटील यांना दोन मुलगे आहेत. १९८८ मध्ये श्रीकृष्ण जयंतीचे निमित्त साधून अमळनेरला सुभाष चौक परिसरात मोठा मुलगा चि. योगेश याच्यासाठी ' नंदन ' नावाने स्वमालकीची डेअरी सुरू केली. या डेअरीद्वारे श्री. भटा पाटील व चि. योगेश हे ग्राहकांना आनंद देतानाच त्यातून स्वतः सुख शोधण्याचे कार्य अविरतपणे करीत आहेत. या डेअरीद्वारे श्री. भटा पाटील यांनी नुसताच सेवाभाव नव्हे, तर ग्राहकांत म्हशीचे व गीर गाईचे शुद्ध, ताजे व निर्भेळ दूध पुरवत विश्वास संपादन करीत समाधानाची पेरणीही केली आहे. हा व्यवसाय करतानाच लहान मुलगा चि. प्रमोदकडेही विशेषत्वाने श्री. भटा पाटील यांनी लक्ष पुरविले. त्यामुळे चि. प्रमोदने बी.ई.पर्यंतचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. त्यानंतर तो सद्यःस्थितीत चोपडा नगरपालिकेत अभियंता पदावर कार्यरत आहे. एकंदरीतच श्री. भटा पाटील नंदन डेअरीच्या माध्यमातून स्वतःचा जीवनप्रवास समृद्धीकडे नेताना दिसत आहेत.

पान १ वरून...

## तालुक्यात भेसळयुक्त दुधाचा धंदा तेजीत !

लिटर दूध देणाऱ्या म्हशी असल्याचे सांगून नागरिकांची दिशाभूल होत आहे. एकच म्हैस असूनही दररोज १५० ते २०० लिटर दूध विक्रेते आहेत. विशेष म्हणजे या म्हशी वर्षभर दूध देतात, गाभणही होत नाहीत, यावरून दूधात भेसळीचा शक्यता व्यक्त होत आहे.

तालुक्याच्या लोकसंख्येला घरोघरी लागणारे रोजचे दूध, चहा, कॉफी विक्रेत्यांना लागणारे मोठ्या प्रमाणावर दूध, हॉटेल व्यावसायिक व मिठाई विक्रेत्यांना लागणारे दुध, आईस्क्रीम बनविण्यासाठी लागणारे मोठ्या प्रमाणावरील दुध याचा विचार करता तितक्या प्रमाणात दुध देणाऱ्या गायी व म्हैस अमळनेर तालुक्यात नक्कीच नाहीत. जळगाव जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यातुनही प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये अमळनेरात दुध येते. तरीही या दुधासह तालुक्यात गायी, म्हशींद्वारे मिळणारे दुध आणि एकूण वापर हे गणित कोठेच जमत नाही. त्यामुळे अमळनेर तालुक्यात शेकडो लिटर नकली दुधाची रोज विक्री होतेच हे त्रिकालाबाधित सत्य आहे. संबंधित यंत्रणा वर्ष दोन वर्षात त्यांना कधी तरी जाग आल्यावर छापेमारी करते. त्यातून मोठी चिरीमिरी होते. काहींवर थातुरमातूर कारवाई होते. आणि सगळ्यात धक्कादायक बाब म्हणजे कायद्यातील तरतुदींमुळे अशा भेसळखोरांना तत्काळ जामीनही मंजूर होतो. घराघरात लहान लाहन बालके हे दूध पितात, अबालवृद्धही त्याचे सेवन करतात. त्यामुळे भेसळीचे दुध पिणाऱ्या सर्वांनाच विविध आजारांना बळी पडावे लागते. मात्र, माणुसकीहीन असलेल्या भेसळ दुध निर्मात्यांना त्याचे काहीही सोयरेसुतक नसते.

तालुक्यात व जिल्ह्यात यापूर्वीही भेसळयुक्त दुध विक्रीप्रकरणी अनेकांवर कारवाई झाली आहे. मात्र, आता पुन्हा हा प्रकार सुरू झाला असल्याचे अनेक ग्राहकांचे म्हणणे आहे. अन्न व औषध प्रशासनाने भेसळयुक्त दूध शोध मोहिम राबवावी. एक-दोन म्हशी असूनही शेकडो लिटर दूध कसे विकले जाते? याची तपासणी करावी. दोषी आढळलेल्या दूध व्यवसायिकांवर कठोर कारवाई करावी. आरोग्याची खेळणाऱ्यांना धडा शिकवावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



## अमळनेर वकील संघातर्फे कामबंद आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर एका वकीलाने बूट फेकण्याचा प्रयत्न केला. ही घटना दिल्ली येथे सोमवार, दि. ६ ऑक्टोर रोजी घडली होती. या घटनेचे संपूर्ण देशभरात तीव्र पडसाद उमटले. या घटनेच्या निषेधार्थ येथील वकील संघाने बुधवार दि. ८ ऑक्टोबर रोजी कामबंद आंदोलन केले. जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधिश यांना निवेदन देण्यात आले. वकिलांनी दिवसर त्यांचे कामकाज बंद ठेवले होते. या हल्ल्याचा प्रयत्न केवळ सरन्यायाधीश गवई यांच्यावर झाला नसून तो न्यायव्यवस्थेवर झाला आहे, असे निवेदनात म्हटले आहे. वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. किरण पाटील यांच्या नेतृत्वात हे आंदोलन झाले. यावेळी वकील संघाचे सर्व पदाधिकारी व वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

– जळगाव जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांचे सभापती पदाचे आरक्षण जाहीर झाले आहेत. यात पारोळा-अनुसुचितजाती, बोदवड- अनुसुचित जाती (महिला), भुसावळ - अनुसुचितजमाती, चोपडा - अनुसुचितजमाती, अमळनेर - नागरिकांचा मागास प्रवर्ग, एरंडोल- नागरिकांचा मागास प्रवर्ग, रावेर - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) मुक्ताईनगर - नागरिकांचा मागासवर्ग (महिला), चाळीसगाव- सर्वसाधारण (महिला) , जळगाव- सर्वसाधारण (महिला), जामनेर - सर्वसाधारण (महिला), धरणगाव - सर्वसाधारण (महिला), यावल - सर्वसाधारण, पाचोरा- सर्वसाधारण, भडगाव - सर्वसाधारण.

## जळोद येथे जुगार अड्ड्यावर छापा; चौघांवर गुन्हा दाखल

अमळनेर : तालुक्यातील जळोद येथे पोलिस उपअधीक्षकांच्या पथकाने मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या छाप्यात चार जणांना जुगार खेळताना ताब्यात घेण्यात आले. रोख रक्कम, मोबाईल आणि ९ मोटारसायकल असा एकूण २ लाख ६७ हजारांचा मुद्देमा जप्त केला आहे. युवराज शिवराम कोळी (वय ४५), सागर युवराज कोळी (वय २६), सुनील अर्जुन साळवे (वय ४६) व गणेश आधार कोळी (वय ५२, सर्व रा. जळोद) या आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्यावर अमळनेर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपअधीक्षक विनायक कोते यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रमोद बागडे, गणेश पाटील, हितेश बेहरे, शेखर साळुंखे, सुनील जाधव, विजय भोई, राहुल पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली.

फ्रेश पॉईंट
चहा | कॉफी | ग्रीन टी | दूध
थंड पेय | ब्लॅक टी | लेमन टी
तुमचं मूड करा फ्रेश...!
पत्ता : ट्रक टर्मिनस शॉपी, बाजार समिती समोरील दत्त मंदिर समोर, धुळे रोड, अमळनेर

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

## शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी दिलीच पाहिजे : प्रा. सुभाष पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतात सुमारे ६० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. मात्र, शेतीवरील शासकीय बजेट व खतावरील अनुदान कमी करण्यात आले आहे. २०२१चे अमळनेर तालुक्यातील नुकसान भरपाईचे ५३ कोटी रुपये अद्याप मिळालेले नाहीत. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च जास्त येतो आहे. त्या तुलनेने हमीभाव कमी मिळतो आहे. शिवाय पीक विमाही मिळत नाही. तसेच खते, बियाणे, कीटकनाशकेही महागली आहेत. अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. या पार्श्वभूमीवर सर्व शेतकऱ्यांना आता तरी सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी बाजार समितीचे संचालक तथा शेतकरी नेते प्रा. सुभाष पाटील यांनी केली आहे.

तालुक्यातील रणाईचे येथे महाविकास आघाडीतर्फे झालेल्या मतदार जागृती अभियानाप्रसंगी ते बोलत होते. प्रा. अशोक पवार म्हणाले, की केंद्र सरकार गेल्या दहा वर्षापासून भांडवलदारांची कर्जमाफी व करमाफी करते आहे. मात्र, शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते आहे. सरकारला याबाबत जाब विचारला पाहिजे. महाराष्ट्रातील विविध विभागातील ३ लाख रिक्त पदे शासनाने त्वरित भरावीत. याप्रसंगी शिवसेना (उबाठा) संपर्कप्रमुख कारभारी आहेर, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस संदीप घोरपडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे डी. एम. पाटील आदींनीही मनोगते व्यक्त केली. शिवसेनेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र मराठे, संघटक देवेंद्र देशमुख, डी. ए. पाटील, बापूराव ठाकरे, मनोज भोई, जे. व्ही. पाटील, अरुण पाटील, भटू पाटील आदी उपस्थित होते. संजय गोकुळ पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

## ' मनाचे श्लोक ' नावाच्या चित्रपटाला हिंदूंचा विरोध

### चित्रपटाचे नाव न बदलल्यास हिंदू समाज तो प्रदर्शित होऊ देणार नाही : हिंदू जनजागृती समिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामी यांनी रचलेल्या ' मनाचे श्लोक ' या पवित्र धार्मिक ग्रंथाच्या नावाचा वापर करून त्याच नावाने मराठी चित्रपटाची निर्मिती करणे, हा हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडण्यासारखे आहे. हा समर्थ रामदास स्वामींचा अवमानच आहे. उच्चतम नैतिकमूल्ये शिकविणाऱ्या ग्रंथाचे नाव केवळ मनोरंजन, व्यावसायिक लाभ आणि समर्थभक्त यांच्या धार्मिक भावना पायदळी तुडविण्याचा प्रकार आहे. संत परंपरेचा हा अवमान हिंदू समाज कदापी सहन करणार नाही. जर या चित्रपटाचे नाव तत्काळ बदलले नाही, तर हिंदू समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करेल आणि चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही. सरकार आणि सेन्सॉर बोर्ड (चित्रपट परिनिरीक्षण मंडळ) यांनी तातडीने गंभीर नोंद घेऊन ' मनाचे श्लोक ' हे पवित्र नाव चित्रपटाच्या शीर्षकातून हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केली आहे.

यासंदर्भातील प्रसिद्धीपत्रकात श्री. घनवट यांनी म्हटले आहे, की समितीच्या वतीने सरकार आणि सेन्सॉर बोर्ड यांना निवेदन देण्यात येणार असून, संबंधितांना कायदेशीर नोटीसही पाठविली जाईल. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली कुणी कुराण किंवा बायबल यांसारख्या धार्मिक ग्रंथांची नावे वापरून चित्रपट बनविण्याचे धाडस करेल का? आणि जरी केले तरी सेन्सॉर बोर्ड त्याला अनुमती देईल का? मग केवळ हिंदूंच्याच धार्मिक भावना वारंवार का दुखावल्या जातात? यापूर्वी ' द दा विंची कोड ' आणि ' विश्वरूपम् ' यांसारख्या चित्रपटांमुळे अनुक्रमे ख्रिस्ती आणि मुस्लिम यांच्या भावना दुखावल्याने अनेक राज्यांत त्यांच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली होती. ' मनाचे श्लोक ' या चित्रपटासंदर्भातही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि सेन्सॉर बोर्ड उत्तरदायी असतील.

### धार्मिक प्रतिक्रियांचा अवमान रोखण्यासाठी कायदा व्हावा

श्री. घनवट यांनी नमूद केले आहे, की सर्वोच्च न्यायालयाने लालबाबू प्रियदर्शी विरुद्ध अमृतपाल सिंह या खटल्यात स्पष्ट केले आहे, की ' रामायण 'सारख्या पवित्र ग्रंथाच्या नावांचा वापर व्यावसायिक लाभासाठी मक्तेदारी म्हणून करता येत नाही. या तत्त्वानुसार ' मनाचे श्लोक ' हे नाव चित्रपटासाठी वापरणे कायद्याच्या आणि नैतिकतेच्या विरोधात आहे. भारतीय न्यायसंहिता कायदा १९५२ च्या कलम-५ नुसार सामाजिक सलोखा आणि नैतिकता धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही चित्रपटाला प्रमाणपत्र न देण्याचे उत्तरदायित्व सेन्सॉर बोर्डाचे आहे. ' मनाचे श्लोक ' हे शीर्षक चित्रपटातून त्वरित मागे घ्यावे. केंद्र आणि राज्य सरकार यांनी भविष्यात अशा प्रकारे धार्मिक प्रतिकांचा चुकीचा वापर रोखण्यासाठी कठोर कायदा व्हावा.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
' चमकण्याची '
तसेच आपली
व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी
जाहिरात रूपाने
प्रचंड मोठ्या प्रमाणावर
करण्याची
सुवर्णसंधी...!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# संकष्ट चतुर्थी : संकटांवर मात करणारी श्रद्धेची चांदण्यांची रात्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणामागे विज्ञान, श्रद्धा आणि सामाजिक मूल्यांचा अद्भुत संगम दिसतो. त्यातील एक अत्यंत लोकप्रिय आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा सण म्हणजे संकष्ट चतुर्थी. ज्याला संकष्टी गणेश चतुर्थी असेही म्हणतात. हा सण दर महिन्याच्या कृष्णपक्षातील चतुर्थीला साजरा केला जातो, आणि वर्षातील सर्वांत महत्त्वाची चतुर्थी म्हणजे ‘ माघी संकष्ट चतुर्थी’, जी एकदा येते आणि ती विशेष शुभ मानली जाते.

### संकष्ट चतुर्थीचे धार्मिक महत्त्व

‘ संकष्ट ’ म्हणजे संकट, आणि ‘ चतुर्थी ’ म्हणजे चतुर्थ दिवस. म्हणजेच संकष्ट चतुर्थी म्हणजे संकटांचा नाश करणारा दिवस. हिंदू धर्मातील परंपरेनुसार भगवान गणपती हे विघ्नहर्ता, बुद्धिदाता आणि मंगलमूर्ती आहेत.या दिवशी उपवास, प्रार्थना आणि चंद्रदर्शनानंतर केलेली पूजा सर्व संकटांपासून मुक्ती देते, असा विश्वास आहे. या दिवशी भक्त ‘ ओम गं गणपतये नमः ’ या मंत्राचा जप करतात आणि सायंकाळी चंद्रदर्शनानंतर गणपती यांची पूजा केली जाते. श्री गणेश यांना मोदक, दूर्वा, लाल फुले आणि नैवेद्य अर्पण करून व्रत पूर्ण केले जाते. हे व्रत स्त्रिया आणि पुरुष दोघेही श्रद्धेने पाळतात.



### चंद्रदर्शन आणि व्रतविधान

संकष्ट चतुर्थीच्या दिवशी सूर्योदयापासून चंद्रदर्शनापर्यंत उपवास केला जातो. संध्याकाळी चंद्राच्या किरणांनी गणपती यांच्यावर अर्घ्य अर्पण करून व्रताची सांगता केली जाते. या दिवशी चंद्राच्या दर्शनाने ‘ शांती आणि प्रसन्नता ’ प्राप्त होते, असे मानले जाते. तसेच सकाळी दुर्वा आणि सायंकाळी गूळ-मोदकाचा नैवेद्य ही पूजा विधीची अनिवार्य परंपरा आहे. संकष्ट चतुर्थी हा सण आपल्याला सांगतो, की श्रद्धा असेल तर संकटही संधी बनते. श्री गणेश यांचे स्मरण हे केवळ धार्मिक विधी नाही, तर तो आत्मविश्वास, शांती आणि सकारात्मकतेचा स्रोत आहे. या चतुर्थीच्या शुभप्रसंगी आपण सर्वांनी आपल्या जीवनातील ‘ संकट’ नव्हे, तर ‘ संघर्ष ’ म्हणून पाहावे. श्री गणेश यांच्या आशीर्वादाने त्यावर मात करावी. विघ्नहर्ता श्री गणेश प्रत्येक संकटावर तुमचा प्रकाश राहो, हीच विनम्रतापूर्वक प्रार्थना.

### श्रद्धा आणि विज्ञान यामागील तत्त्वज्ञान

सणामागे विज्ञान दडलेले असते. संकष्ट चतुर्थीच्या काळात चंद्राच्या कलांमुळे मनावर होणारा परिणाम शांत करण्यासाठी उपवास आणि ध्यान उपयुक्त ठरते. गणपती यांची उपासना ही एकाग्रतेचा आणि आत्मशांतीचा मार्ग आहे. उपवासामुळे शरीराला विश्रांती मिळते आणि मनावर नियंत्रण येते, हे विज्ञानाचेही मत आहे.

### समाजात सणाचे सांस्कृतिक महत्त्व

आजच्या युगात संकष्ट चतुर्थी केवळ धार्मिक विधी नसून, ती एक सामाजिक शिस्त आणि एकात्मतेचा सण आहे. या दिवशी अनेक कुटुंबे एकत्र येऊन पूजा करतात, कथा ऐकतात आणि प्रसाद वाटतात. श्री गणेश यांची ही उपासना विघ्नहर्त्याची नव्हे, तर मनःशांतीची प्रेरणा देते.

# गौरी-शंकर : परम प्रेम, तप अन् अखंड सृष्टीची प्रतीक जोडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘ जेथे गौरी तेथे शंकर...जेथे भक्ती तेथे मुक्ती...’ गौरी-शंकर ही केवळ एक वैवाहिक जोडी नाही. सृष्टीच्या समतोलाचे, त्यागाचे आणि अखंड प्रेमाचे शाश्वत प्रतीक आहे. या जोडीचा उल्लेख वेद, उपनिषदे, पुराणे आणि आगमशास्त्रातही अत्यंत पवित्रतेने आलेला आहे.

**गौरी म्हणजे कोण?**
गौरी म्हणजे माता पार्वती. हिमालयपुत्री, गिरिजा, उमा, शिवा, भवानी या सर्व नावांनी ओलखल्या जाणाऱ्या. त्या सतीचा पुनर्जन्म. ज्यांनी तपश्चर्येच्या अग्नीत स्वतःला सिद्ध करून भगवान शंकर यांना पतीरूपात प्राप्त केले. ‘ शिवपुराण ’मध्ये माता पार्वती यांच्या तपाचे अत्यंत सखोल वर्णन आहे. ३००० वर्षांच्या तपाने त्यांनी भगवान शंकर यांना प्रसन्न केले. त्यांचे सौंदर्य, नम्रता आणि निश्चल प्रेम हे शंकरासारख्या विरक्त, अघोरी योगीला गृहस्थाश्रमात बांधून ठेवते.

**भगवान शंकर म्हणजे कोण?**
भगवान शंकर म्हणजे विश्वाचा नाशक आणि पुनर्निर्माणकर्ता. वैराग्याचे मूर्तिमंत स्वरूप. अनासक्त योगी. गौरीसाठी प्रपंच स्वीकारलेले.
त्यांनी गौरीच्या तपाचे आदरपूर्वक स्मरण करत स्वीकार केला. जे एक ईश्वराचे नम्र रूप दर्शविते. ‘ कुमारसंभव ’ (कालिदास)मध्ये भगवान शंकर यांच्या विरक्तपणावर आणि गौरीच्या प्रेमावर सुंदर काव्यमय वर्णन आहे. ‘ शिवतांडवस्तोत्र ’मध्ये भगवान शंकर यांच्या रूपाचे आणि त्यांच्या सौंदर्याचे वर्णन आहे. जे माता पार्वती यांनी अनुभवले.

**गौरी-शंकर : सृष्टीचे संतुलन**
गौरी ही शक्ती आहे. शिव आणि गौरी यांच्या मीलनातून कार्तिकेय, श्री गणेशासारखे महापुरुष आणि सृष्टीचा प्रवाह जन्माला आले. माता पार्वती यांनी श्रीचक्र साधनेत महत्त्वाचे स्थान मिळविले. तर भगवान शंकर अर्धनारीनटेश्वर म्हणून एकत्वाचे प्रतीक ठरले.

**गौरी-शंकर पूजनाचे आध्यात्मिक महत्त्व**
श्रावण मास, हरतालिका तृतीया, महाशिवरात्र, गौरी पूजन, नवदुर्गा या प्रसंगांवर त्यांची संयुक्त पूजा केली जाते. विवाहित स्त्रिया सुखी वैवाहिक जीवनासाठी आणि कुमारिका योग्य पतीसाठी माता पार्वती यांचे व्रत करतात.‘ ॐ गौरीशंकराय नमः ’ हा जप योग, आरोग्य, मनःशांती आणि पारमार्थिक प्रगती देतो.

**शास्त्रीय व आध्यात्मिक संदर्भ**
**शिवमहापुराण :** रुद्रसंहितेतील पार्वतीखंड.
**कालिदास :** कुमारसंभव.
**स्कंद पुराण :** श्रीमद् देवी भागवत
**शंकराचार्य रचित सौंदर्य लहरी कविता/भावश्लोक (भक्तीमय ओघात) :**
‘ गौरीच्या ओवाळणाऱ्या पदरात
शंकराची समाधी विसावते,
जगताच्या कणाकणात
ही प्रेमाची जपमाळ फिरते...’
नमः पार्वती पतये हर हर
महादेव...!



# घरात माता लक्ष्मी यांचा वास असावा असे वाटते का ?

## वास्तूचे १० सोपे उपाय आवर्जून करा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माता लक्ष्मी यांना प्रसन्न करण्यासाठी वास्तू टिप्सचा विचार करणे महत्त्वाचे आहे. वास्तुशास्त्रानुसार ज्या घरांमध्ये वास्तूशी संबंधित दोष असतात, त्या घरांमध्ये समस्या, रोग आणि आर्थिक नुकसान अनेकदा त्यांचा पिच्छा सोडत नाही. यानंतरही अनेकवेळा आपण पाहतो, की खूप मेहनत करूनही माणसाला त्याच्या अपेक्षेप्रमाणे फळ मिळत नाही.
वास्तुशास्त्राचे काही सोपे उपाय सांगितले जातात. ते जर तुम्ही तुमच्या घरात वापरले, तर तुम्हाला नक्कीच चांगले परिणाम जाणवतील. जर वास्तूसंदर्भातील नियम योग्यरित्या अंगीकारले, तर तुमच्या समस्या नक्कीच बऱ्याच अंशी दूर होतील.

**घरात हळद मिसळलेले पाणी शिंपडा**
वास्तूनुसार सकाळी साफसफाई केल्यानंतर पाण्यात हळद विरघळवून घ्या. हे द्रावण सुपारीच्या पानाच्या सहाय्याने संपूर्ण घरात फवारावे. यामुळे लक्ष्मीचा वास राहतो. तुमच्या घरात शांतीही राहते. तसेच घराची साफसफाई केल्यानंतर गंगाजल शिंपडल्याने नकारात्मक शक्ती दूर होतात. वास्तुदोषही दूर होतात.

**धार्मिक पुस्तके योग्य दिशेने ठेवा**
चुकीच्या दिशेने ठेवलेल्या धार्मिक पुस्तकांमुळे वास्तुदोष निर्माण होतात. वास्तूनुसार धार्मिक ग्रंथ आणि धर्मग्रंथ नेहमी पश्चिम दिशेला आणि ईशान्य दिशेला ठेवावेत. धार्मिक पुस्तके कधीही इतर कोणत्याही दिशेने आणि गादी किंवा उशीखाली ठेवू नयेत. वास्तूनुसार अशा प्रकारे कुठेही धार्मिक पुस्तके ठेवणे शुभ मानले जात नाही.

**तुमच्या घरातील मंदिरात या गोष्टींची विशेष काळजी घ्या**
वास्तूनुसार घरातील मंदिरात नियमित साजूक तुपाचा दिवा लावावा. मंदिराच्या आणि घराच्या प्रत्येक भागात घंटानाद करायला हवा. यामुळे घरातील सर्व प्रकारची नकारात्मक ऊर्जा दूर होते. तसेच घरामध्ये शंख फुंकल्यानेही घरातील वास्तुदोष दूर होतात. घरातील पूजेच्या ठिकाणी अर्पण केलेल्या फुलांचे हार दुसऱ्या दिवशी काढून देवाला नवीन फुलांचे हार अर्पण करावेत. तसेच देवतांची चित्रेही समोरासमोर ठेवू नयेत. यामुळे दोष निर्माण होतात.

**दाराजवळ झाडू कधीही ठेवू नका**
वास्तुशास्त्रानुसार घराच्या साफसफाईसाठी ठेवलेला झाडू कधीही दाराजवळ ठेवू नका. झाडू पुन्हा-पुन्हा पायावर आदळल्यास आर्थिक नुकसान होते. चुकूनही झाडूवर जड वस्तू ठेवू नका. घरामध्ये येणाऱ्या-जाणाऱ्यांची नजर नेहमी झाडूवर पडेल, अशा ठिकाणी झाडू ठेवू नका. त्यामुळे आर्थिक नुकसानही होते. झाडू नेहमी लपवून ठेवावा.

**घरातील चित्रे मनाला सुखावणारी असावीत**
वास्तूनुसार आपण आपल्या घराच्या भिंतींवर सुंदर, हिरवाईने भरलेली आणि मनाला प्रसन्न करणारी चित्रे लावली पाहिजेत. यामुळे घरातील सर्व सदस्यांना होणाऱ्या मानसिक समस्यांपासून आराम मिळतो.

**दक्षिणेकडे डोके ठेवून झोपा**
वास्तूनुसार घरातील कोणत्याही सदस्याला रात्री झोप येत नसेल किंवा वास्तुदोषामुळे चिडचिड होत असेल, तर त्याला दक्षिण दिशेकडे डोके ठेवून झोपवावे. यामुळे त्याच्या स्वभावात बदल होईल. निद्रानाशाची स्थितीही सुधारेल.



**घराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना अशोकाची झाडे लावा.**
वास्तूनुसार घराच्या उत्तर-पूर्व दिशेला कधीही कचरा साचू देऊ नका. जड वस्तू आणि यंत्रसामुग्री इकडे -तिकडे ठेवू नका. वास्तूनुसार तुमच्या वंशाच्या प्रगतीसाठी घराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस अशोकाची झाडे लावा.

**श्रीयंत्र हे माता लक्ष्मीचे दाता आहे**
वास्तूनुसार शुभ मुहूर्तावर स्फटिक श्रीयंत्राची स्थापना तुमच्या घराच्या ईशान्य कोपऱ्यात किंवा ब्रह्मस्थळावर करा. हे श्रीयंत्र माता लक्ष्मीचीही दाता आहे. त्याचबरोबर घरातील वास्तुदोषही काही प्रमाणात दूर होतात.

**दररोज तुळशीची पूजा करावी**
वास्तूनुसार तुमच्या घराच्या ईशान्य कोपऱ्यात तुळशीचे रोप लावा आणि रोज सायंकाळी येथे तुपाचा दिवा लावा. तुळशी हे देवी लक्ष्मी यांचे रूप आहे. त्यामुळे आपल्या घरातील सुख-शांतीसाठी आपण नियमितपणे तुळशीजींची प्रार्थना केली पाहिजे.

**वाळलेली फुले घरात ठेवू नका**
वास्तूनुसार घरातील कोणत्याही खोलीत वाळलेली फुले ठेवू नयेत. तुमच्या घरातील फुलदाण्यांमध्ये ठेवलेली फुले वाळली, तर नवीन फुले लावा. वाळलेली फुले काढून टाका.

# कश्यप ऋषी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘ कश्यप ’ हे गोत्रप्रवर्तक ऋषींचे नाव आहे. ऋग्वेदात त्यांचा फक्त एकदा उल्लेख आहे. परंतु इतर वेदांमध्ये त्यांचा अनेकदा निर्देश आढळतो. ऋग्वेदातील काही सूक्तांचे ते द्रष्टा मानले जातात. कश्यपाचे विशेषण ‘ मारीच ’ आहे. म्हणजेच मरीचीचा पुत्र. श्रौतसूत्रांच्या गोत्रप्रवराध्यायांत कश्यप गोत्राचा उल्लेख आहे. याचे कश्यप, अवत्सार आणि निध्रुव असे तीन प्रवर सांगितले आहेत. हे गोत्रनाम असल्याने ते त्या गोत्रातील कोणत्याही व्यक्तीला उपनामासारखे लागू होते. शतपथ ब्राह्मणात ‘ कश्यप नैध्रुवी ’ (निध्रुवाचा पुत्र) असा उल्लेख आहे. विश्वकर्मा भौवन राजाचा अभिषेक करणारा पुरोहित म्हणूनही कश्यपाचा ब्राह्मणग्रंथांत निर्देश आहे. बहुतेक प्राचीन व अर्वाचीन पुराणांमध्ये कश्यपाला प्रजापती आणि सप्तर्षींपैकी एक मानले आहे. पुराणांनुसार अदितीपासून देव, दितीपासून दैत्य, विनतेपासून गरुड व अरुण, तसेच कद्रुपासून नाग यांचा जन्म झाला. मनुष्य, पशू, पक्षी, जलचर आणि सर्प यांसारखी प्राणिसृष्टी कश्यपाच्या अन्य पत्नींपासून उत्पन्न झाली, असा पुराणांमध्ये उल्लेख आहे. पृथ्वी ही कश्यपाची कन्या आणि अवतारी वामन हा त्याचा पुत्र असल्याचे भागवतात सांगितले आहे. तसेच परशुरामाने पृथ्वी जिंकून ती कश्यपाला दान दिल्याचा उल्लेखही भागवतात आहे.
कश्यप हा बुद्धाचा श्रेष्ठ शिष्य होता, असे त्रिपिटकात नमूद आहे. आयुर्वेदातील ‘ कश्यपसंहिता ’ या ग्रंथाचा कर्ता म्हणूनही त्याची ओळख आहे. बौधायनाने कश्यपाला धर्मसूत्रकार म्हणून निर्देशित केले आहे आणि त्याच्या नावाचा एक स्मृतिग्रंथही आहे. शिवाय कश्यप हा शिल्पशास्त्रकार म्हणूनही ओळखला जातो.

# कोणत्याही गुरुवारी करायच्या सेवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जो कोणी गुरुवारी विधीपूर्वक पूजा करतो त्याला गुरू ग्रहाशी संबंधित शुभ परिणाम प्राप्त होतात. हिंदू धर्मात गुरुवार हा भगवान विष्णू यांना समर्पित आहे. असे मानले जाते, की भगवान विष्णू यांची पूजा केल्याने सर्वांच्या मनोकामना पूर्ण होतात. घरात सुख-समृद्धी येते. याशिवाय गुरू ग्रह ज्याला देवांचे गुरू म्हटले जाते त्यांचा आशीर्वाद प्राप्तीसाठी गुरुवारचा दिवस शुभ आहे. जो कोणी गुरुवारी विधीपूर्वक पूजा करतो त्याला गुरू ग्रहाशी संबंधित शुभ परिणाम प्राप्त होतात. ज्यामुळे घरामध्ये समृद्धी येते. कुंडलीतील गुरू ग्रह बलवान होतो. गुरू ग्रहाच्या शुभ प्रभावामुळे व्यक्तीचे जीवन सकारात्मकतेने भरलेले असते. कधीही आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत नाही. कामाच्या ठिकाणी मान-सन्मान वाढतो. दीर्घायुष्य प्राप्त होते. वैवाहिक जीवनही आनंदी राहते. गुरुवारी पिवळे कपडे घालणे शुभ असते. पत्रिकेतील गुरू ग्रह बलवान होण्यासाठी गुरुवारी पिवळे कपडे घालणे खूप शुभ मानले जाते. भगवान बृहस्पती यांना पिवळा रंग खूप प्रिय आहे. अशा परिस्थितीत गुरुवारी पिवळे कपडे परिधान केल्याने साधकाच्या जीवनावर चांगला परिणाम होतो.

### अशी करा भगवान विष्णूंची पूजा

भगवान विष्णूंच्या पूजेवेळी त्यांना पिवळे फूल अर्पण करावे. भगवान विष्णू यांना गूळ आणि मसूर अर्पण करावा. पंचामृत आणि तुळशीही ठेवावी.

### विष्णुसहस्रनामाचे पठण

या दिवशी विष्णुसहस्रनामाचा पाठ करणे अत्यंत शुभ मानले जाते. त्यामुळे सर्व रखडलेली कामे पूर्ण होऊन प्रत्येक क्षेत्रात यश मिळते.
पिंपळ, तुळशी आणि केळीच्या झाडाला पाणी द्यावे
भगवान विष्णू यांची कृपा प्राप्तीसाठी गुरुवारी पिंपळ, तुळशी आणि केळीच्या झाडांची लागवड करावी. त्यानंतर त्यांची पूजा करावी. यामुळे कुंडलीत गुरू ग्रहाशी संबंधित शुभ परिणाम येऊ लागतात.

### हळद किंवा केशर तिलक

भगवान विष्णू आणि देवगुरू बृहस्पती यांच्या पूजेवेळी हळद किंवा केशरचा तिलक वापरावा. यानंतर स्वतः चंदनाचा टिळा लावावा.



# शिवलिंग आणि ज्योतिर्लिंग यांच्यात नेमका फरक काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात भगवान शिव सर्वांत शक्तिशाली देवांपैकी एक आहे. भगवान शिव या देवतेला शंकर, महादेव, नटराज, रुद्र अशा अनेक नावांनी ओळखले जाते. त्यांना आदियोगी, परम तपस्वी, सर्व-दयाळू आणि दैवी रक्षक मानले जाते. भगवान शंकराची विविध रूपांत पूजा केली जाते. भिंतींवर टांगलेल्या त्यांच्या आणि देवी पार्वतीच्या प्रतिमा असोत, मंदिरात शिवलिंगाची पूजा असो किंवा भगवान नटराजच्या मूर्ती असोत. शिवलिंग आणि ज्योतिर्लिंग स्वरूपातील पूजेला विशेष महत्त्व आहे. अनेकांचा असा समज आहे, की शिवलिंग आणि ज्योतिर्लिंग एकच असतात. परंतु खरे सांगायचे झाल्यास यात फरक आहे. तो फरक काय? त्याविषयी जाणून घेऊ.

### शिवलिंग कसे तयार केले जाते?

‘ शिवलिंग ’ विविध साहित्याने तयार केले जाते. पारंपरिकपणे ते संगमरवरी किंवा दगडाने तयार केले जात असे. परंतु आता लोक ते धातू, लाकूड किंवा अगदी मातीपासून तयार करू लागले आहेत. खरेतर काही लोक ‘ बाबा बर्फानी ’ म्हणजेच भगवान शिवाच्या अमरनाथ गुहेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी बर्फाचा वापर करून सावन शिवलिंगही तयार करतात. शिवलिंग तयार करण्यासाठी वापरली जाणारी सर्वांत सामान्य सामग्री म्हणजे दगड, विशेषतः काळा ग्रॅनाइट किंवा संगमरवरी आणि इतर सामग्रीमध्ये सोने, चांदी, तांबे किंवा पितळ यांचा समावेश होतो.



### भारतातील १२ ज्योतिर्लिंगे

भारतात १२ ज्योतिर्लिंगांना सर्वांत शक्तिशाली आणि पवित्र मानले जाते. ही १२ ज्योतिर्लिंगे पूर्वेकडून पश्चिमेकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेपर्यंत भारतभर पसरलेली आहेत. त्यात गुजरातमध्ये सोमनाथ ज्योतिर्लिंग आणि नागेश्वर ज्योतिर्लिंग, आंध्र प्रदेशातील मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग, मध्य प्रदेशातील महाकालेश्वर ज्योतिर्लिंग आणि ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग, उत्तराखंडमधील केदारनाथ ज्योतिर्लिंग, महाराष्ट्रातील भीमाशंकर ज्योतिर्लिंग, त्र्यंब्यकेश्वर ज्योतिर्लिंग आणि घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग, उत्तर प्रदेश येथील काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग, झारखंडमधील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग, तमिळनाडूमधील रामेश्वर ज्योतिर्लिंगचा समावेश आहे.

### शक्तिशाली ज्योतिर्लिंग कोणते?

१२ ज्योतिर्लिंगांपैकी वाराणसीमधील ‘ काशी विश्वनाथ ’ हे सर्वांत शक्तिशाली आणि पवित्र ज्योतिर्लिंग मानले जाते. भारतातील सर्वांत प्राचीन आणि सर्वांत पवित्र शहरांमध्ये स्थित, काशी विश्वनाथ हे विश्वाचे शासक असल्याचे म्हटले जाते. लोकांचा असा विश्वास आहे, की काशी विश्वनाथ मंदिरातील दर्शन आणि गंगा स्नानामुळे भूतकाळातील पाप मिटतात आणि मोक्ष प्राप्त करण्यासही मदत होते.

### शिवलिंग म्हणजे काय?

‘ शिवलिंग ’ हे भगवान शिव यांचे रूप आहे. त्याची पूजा सर्वांत व्यापक आणि सामान्यपणे केली जाते. शिवलिंगाचे प्रकाशाच्या वैश्विक स्तंभाचे प्रतीक म्हणून वर्णन केले जाते. ज्यामध्ये भगवान शिव यांची आभा आहे. शिवलिंग आकाराने दंडगोलाकार आणि त्याभोवती शाळुंका असा शिवलिंगाचा आकार असतो.

### ज्योतिर्लिंग म्हणजे काय?

‘ ज्योतिर्लिंग ’ हे भगवान शिव यांचे रूप आहे . ते माणसाने निर्माण केलेले नाही. ज्योतिर्लिंग हे ‘ स्वयंभू ’ असल्याचे म्हटले जाते. म्हणजेच ते स्वतःच प्रकट झालेले आहे. मानवी हातांनी तयार केलेले नाही. ज्योतिर्लिंग सोन्याने, दगडाने किंवा तांब्याने तयार करण्याऐवजी स्वतः देवाची ऊर्जा आणि मातीने तयार गेले, असे म्हणतात.